जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८३८ दिनांक - ३०/११/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सोमनाथ अशोक कुंभार (टोळी प्रमुख) व त्याचा एक साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दिनांक १६/०९/२०२३ रोजी फिर्यादी यांचे वडील हे सोमनाथ कुंभार याचे घरी उसने दिलेले १०,०००/- रुपये मागण्यासाठी गेले असता,सोमनाथ कुंभार व त्याचा मित्र रोहित पाटेकर यांनी त्यांचेकडे उसने दिलेले १०,०००/- रुपये मागितल्याचे कारणावरुन,लोंखडी विळी,लाकडी दांडके,लोखंडी फुकणी इत्यादी हत्याराने फिर्यादी यांचे वडिलांच्या डोक्यावर,गळयावर व शरीराचे इतर भागावर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारले. त्यानंतर सोमनाथ कुंभार याने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने हातात लोखंडी फुकणी घेवुन फिर्यादी यांचे अंगावर धावुन आला म्हणुन फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने **भारती विद्यापीठ पोलीस ठाणे गु.र.नं.५८६/२३,भादवि.३०२,५०४,५०६(२),३५२,३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१)सोमनाथ अशोक कुंभार,वय २८ वर्ष,रा.टेल्को कॉलनी, दत्तनगर,जांभुळवाडी रोड,आंबेगाव-खुर्द,पुणे (टोळी प्रमुख) २)रोहित दिलीप पाटेकर,वय २० वर्षे,रा. गल्ली नं.०१,गणेश चौक,धनकवडी,पुणे (टोळी सदस्य)** यांना अटक करण्यात आली असुन,ते सद्या येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे आहेत.

सदर नमुद आरोपी सोमनाथ अशोक कुंभार (टोळी प्रमुख) याने त्याचे सह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले असुन त्यांनी टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी खुन,खुनाचा प्रयत्न,विनयभंग,दंगा,दुखापत करणे,गंभीर दुखापत करणे,मारामारी, बेकायदेशिर हत्यार जवळ बाळगणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे जनमानसात दहशत पसरविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा-पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन१९९९ चे कलम ३(१)(i)(ii),३(२) व ३(४) प्रमाणे चा अंतर्भाव करणेकामी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड यांनी मा.पो.उप-आयुक्त,परि-२,पुणे शहर,श्रीमती.स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे गु.र.नं.५८६/२३ भादविक ३०२ ५०४,५०६(२),३५२,३४ या गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(i)(ii),३(२)व ३(४)प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगांवकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त परि-२,पुणे शहर,श्रीमती. स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक,श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,कुलदीप व्हटकर, सहा. पोलीस फौज.चंद्रकांत माने, पोलीस अंमलदार,नरेंद्र महांगरे, विशाल वारुळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवून,शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ९२ वी कारवाई आहे.**